

# लिंगायत धर्म : ईतिहास व तत्वज्ञान




सादरकर्ते
प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
पदवी व पद्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड ४३१७१७
इमेल : ratnakarlakshete1@gmail.com
Mobile No.: 9423439276


दिनांक : 30 JULY 2020
वेळ : सायंकाळी 07 ते 09

**आयोजक**
**सिंधुजन अकादमी,पुणे**

- धर्म म्हणजे काय ?

- धर्म हा शब्द संस्कृत धृ या धातूपासून निर्माण झाला आहे .
- धृ – म्हणजे धारण करणे
- आचाराच्या विविध नियमांनी समाजाची धारणा होते . समाजाचे रक्षण होते. अशा आचारांना धर्म मानण्यात आले आहे.
- व्यक्ती व समाज यांनी काय करावे , कसे वागावे , कोणती आचारसंहिता आचरणात आणावी . व्यक्तिगत आणि सामाजिक धारणेची तत्वे कोणती असावीत याचे विवेचन धर्म या शब्दात अभिप्रेत आहे
- भारत हि धर्म भूमी आहे .
- भारत हि जगातील हिंदू , बौद्ध, जैन, शीख व लिंगायत या पाच धर्मांची जननी आहे.
- लिंगायत हा १२ व्या शतकात स्थापन झालेला व लोकशाहीवादी व भारतीय संवैधानिक मुल्यांची आरास असलेला धर्म आहे .

- # लिंगायत धर्म कशास म्हणावे ?

लिंगेन आयात म्हणजे लिंगायत.

यास लिंगवंत धर्म , शरण धर्म , बसव धर्म ,जंगम धर्म असेही म्हणतात.

कायक , दासोह. प्रसाद , ईष्टलिंग पूजक ,परधन –परनारी त्याजून या सर्वांनुसार आचरण करतो तो लिंगायत.

आचारधर्म म्हणजे लिंगायत धर्म

आम आदमीच्या जीवनात आनंदाचा व सुखाचा पिसारा फुलवनारा सिद्धांत म्हणजे लिंगायत धर्म.

कायकजीवी,अनुभावी व बुद्धीप्रामाण्यावादी विचारधारा म्हणजे लिंगायत धर्म

सामाजिक –आर्थिक स्वरुपाची विषमता नसलेला विचार म्हणजे लिंगायत धर्म

# लिंगायत धर्माचा इतिहासाची टप्पे

## बसव कालीन ईतिहास : ११०५-११६७

- पूर्ववर्ती सामाजिक –धार्मिक –आर्थिक व सांस्कृतिक परंपरा व विचारधारे विरुद्ध लिंगायत या विद्रोही कृतीशील तत्वज्ञानाच्या निर्मितीचा उभारीचा काळ.
- या कालखंडातील महात्मा बसवेश्वर , शरण , शरणी चरित्र व त्यांच्या जडणघडणीचा ईतिहास
- मानवी जीवन सुखी व समृद्ध करणाऱ्या अथक पारिश्रमिक वैभवशाली , क्रांतिकारी घटनाक्रमांचा इतिहास
- बागेवाडी , इंग्लेश्वर , कुडलसंगम, मंगळवेढा,बसवकल्याण व दक्षिण भारतात झालेल्या सामाजिक –सांस्कृतिक –आर्थिक व राजकीय बदलाचा ईतिहास
- या काळातील सामाजिक संबंध , व्यक्ती वर्तनात बदल करून निर्माण झालेल्या नव आदर्श व समतायुक्त समाजाचा ईतिहास

- बसवोत्तर युगीन ईतिहास :
- ११६७ ते आजपर्यंतच्या लिंगायत धर्माच्या साहित्यिक संशोधनाचा , नव निर्मितीचा पुनर्बांधणीचा ईतिहास.
- लिंगायत धर्माच्या साहित्य व तत्वज्ञानावर झालेल्या साहित्यिक व सांस्कृतिक आघाताचा व आक्रमणाचा ईतिहास.
- लिंगायत हा स्वतंत्र धर्म , तत्वज्ञान व ओळख आहे हे सांगण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा ईतिहास.
- स्वातंत्र्य आंदोलन , हैद्राबाद मुक्ती संग्राम , संयुक्त महाराष्ट्र आंदोलन ,आर्य समाज ईत्यादितील सहभाग
- डॉ. एम.एम. कलबुर्गी यांच्या हत्ये नंतरच्या घडामोडीचा ईतिहास.
- लिंगायत धर्म व तत्वज्ञानावर आधारित कार्य करणाऱ्या संघटना , व्यक्ती यांचा अभ्यास
- गावोगावी सुरु झालेल्या अनुभवमंटप , धर्म मान्यता आंदोलन, ई- अनुभव मंटप , ई-जयंती , ई- व्याख्यान या स्वाभिमानी घटनांचा अभ्यास

# लिंगायत धर्माच्या अभ्यासाची ऐतिहासिक साधने

| अ.क्र | साधने | विस्तार |
|---|---|---|
| १ | चरित्रे<br><br>नाव व आडनावे | महात्मा बस्वन्ना , शरण –शरणी, संशोधक ,साहित्यिक , विरक्त मठाधीश<br>लिंगायतात नावे व आडनावे बस्वन्ना व शरणाच्या नाव , शरण स्थल यावर आधारित आहेत . |
| २ | वचन साहित्य | १२ व्या शतकातील बसवादी शरण –शरणीचे अनुभव मंटपातील वचने, बसवोत्तर युगीन शरण –शरणी ची वचने |
| ३ | शिलालेख<br><br>शरण स्थळे | १२६० अर्जुनवाडा, १२६२ चौडदानपुर , बागेवाडीचा गुडीह्ळ कुंटोजी, १६८६ जोडीदासेन हल्ली ,<br>कर्नाटक , महाराष्ट्र ,आंध्रप्रदेश |
| ४ | ताम्रपट | १६६० आनंदपूर , १७०० कानकानहल्ली |
| ५ | पुराण | पाल्कुरिके सोमनाथ कृत बसवपुराण, भिमकवी कृत बसवपुराण, पिड्रपर्ती सोमरचित बसव पुराण, शून्य संपादने , प्रभूलिंगलीले , बसवपुराण षटकम |
| ६ | संस्कार (शरण व जंगम ) | ईष्टलिंग पूजा , ईष्टलिंग दीक्षा ,विभूती धारणा , रुद्राक्ष धारणा ,कल्याण महोत्सव , दफन विधी |
| ७ | आहार व लोकसंख्या | शाकाहार , कर्नाटक , महाराष्ट्र , आंध्रप्रदेश व तेलंगाना |

# शिलालेख व वचन

१ २. ३. ४.












ताडपत्रावरील वचन

- लिंगायत धर्माशी संबंधित स्थळे ,घटनाक्रम व व्यक्ती


बागेवाडी – बस्वन्ना जन्म स्थल


इंग्लेश्वर –बस्वन्ना आजोळ


कुडलसंगम –बस्वन्ना समाधी स्थल


बसवकल्याण बिज्जल राजवाडा



बसवकल्याण अनुभव मंटप


बसवकल्याण अनुभव मंटप आतील भाग


एळेहोट शिक्षा


वचन साहित्याचे संरक्षण करताना शरण


उळवी चन्नबसवेश्वर समाधी स्थल



# • लिंगायत धर्माशी संबंधित स्थळे :



तिगडी- कल्याणम्मा हौतातम्य स्थल



अक्कनागम्मा स्मृति स्थल नागलापुर





गंगाम्बिका स्मृति स्थळ बसव पत्नी




अल्लमप्रभू स्मृति स्थळ हातकनंगले



सिद्धरामेश्वर



गुडापूर दान्नम्मा देवी जत



राजा बिज्जल



अनुभव मंटप चर्चा





हेमरेडी मल्लम्मा


# लिंगायत धर्माचे नायक : सारा जहां है जिसकी शरण मे


नमन हो उस महात्मा के चरणो मे
बने उस महात्मा के चरणो कि धूल
आओ मिलकर चढाये श्रद्धा के फुल


अक्कनागलाम्बिका-बहिण



महात्मा बसवन्ना


अक्कमहादेवी


अल्लमप्रभूदेव-अध्यक्ष –अनुभव मंटप


चन्नबसवेश्वर-षटस्थल ज्ञानी


सिद्धरामेश्वर


निलांम्बिका-बसव पत्नी


गंगाम्बिका-बसव पत्नी


मडीवाळ माचिदेव



हरळय्या व कल्याणम्मा

# लिंगायत तत्वज्ञान

- महात्मा बसवन्नाचे तत्वज्ञान म्हणजे लिंगायत तत्वज्ञान
- शरण –शरणी चे तत्वज्ञान म्हणजे लिंगायत तत्वज्ञान
- १२ व्या शतकात निर्माण झालेले वचन साहित्य म्हणजे लिंगायत तत्वज्ञान
- जीवन जगण्याच्या आचार –विचाराची साधी सरळ संहिता म्हणजे लिंगायत तत्वज्ञान
- व्यक्ती व समाजाची धार्मिक- सामाजिक –अध्यात्मिक आचारसंहिता ,नितीशास्त्र व अध्यात्मिक आवरणे म्हणजे लिंगायत तत्वज्ञान
- लिंगायत अनुभववादी , सदाचारी  तत्वज्ञान आहे.

# लिंगायत धर्माचे तत्वज्ञान

## अष्टावरण : धार्मिक आचारसंहिता, आध्यात्मिक आवरणे आहेत .



# पंचाचार : सामाजिक आचारसंहिता व नीतिशास्त्र आहे.

लिंगाचार
(इष्टलिंग- एकदेवोपासना)

सदाचार
(शुद्ध आचरण-
सदाचार वे स्वर्ग )

शिवाचार
(समता व
विश्व बंधुत्व )

गणाचार
(अहिंसात्मक मार्गाने
रक्षण वृत्ती )

भृत्याचार
(दया व मानवतावादी
दृष्टीकोन )

# षटस्थल : आध्यात्मिक आचारसंहिता आहे.(चन्नबसवन्ना )



# लिंगायत धर्माचे तत्वज्ञान : वचन साहित्य

१६० कोटी वचनांची निर्मिती १२ व्या शतकात अनुभव मंटपात झाली भाषा : लोकभाषा कन्नड

वचनकार :७००शरण– ७० शरणी,विविध जाति –धर्मातील, शेतकरी , कष्टकरी लोकांचे साहित्य

आज उपलब्ध वचने : २१०२४ (ईतर वचने कल्याण क्रांतीत नष्ट झाले )

महिला वचनकार : अक्कमहादेवी, दानम्मादेवी, गंगाबिका, सोमादेवी , काळव्वे, रेमव्वे,

चामलादेवी, सत्यवती, सातव्वा, लिंगम्मा, शिवप्रिया , लकम्मा, बोंतादेवी,रेमव्वे, गोगव्वे

पुरुष वचनकार : जेडर दासीमय्या , डोहर कक्कय्या, मातंग चनय्या, महात्मा बस्वन्ना ,अल्लमप्रभू ,चन्नबसवेश्वर , सिद्धरामेश्वर, अरिविने मारीतंदे,

बसवोत्तर युगीन वचन साहित्य : १५ व्या शतकातील करस्थल मल्लिकार्जुनदेव ते १९ व्या शतकातील कडकोळ माडीवाळ पर्यंत ३५ वचनकारांच्या ६७६४ वचनांचा समावेश होतो .

अनुभवाची सूत्र रूपाने घडलेली रचना म्हणजे वचन साहित्य होय .

वचन साहित्य सुधारणावादी आधुनिक मूलगामी विद्रोही विचारधारांचा एकत्रित आविष्कार आहे.

वचन साहित्य लिंगायत धर्माचे संविधान आहे .

वचन साहित्य मानवी हक्काचा वैश्विक जाहीरनामा आहे.

वचन साहित्य राज्यकारभाराची व मानवी जीवनाची आचारसंहिता आहे.

- लिंगायत तत्वज्ञान निर्मितीचे केंद्र : अनुभव मंटप
- सदस्य संख्या : ७७० (७०० पुरुष , ७० स्त्रिया )
- सदस्याचे नाव : शरण (पुरुष ), शरणी (स्त्रिया )
- कामकाजाची भाषा : लोकभाषा कन्नड शांतरस : वचन भांडारी
- अध्यक्ष : अल्लमप्रभू , चन्नबसवेश्वर , सिद्धरामेश्वर
- सदस्य : अठरा पगड जातीतील , १२ बलुतेदार १८ आलुतेदार , सवर्ण –शुद्र , स्त्री –पुरुष , ज्ञान व विवेकाची जिज्ञासा असणारे सर्व.
- साम्य : राजा जनकाच्या धर्म सभा , भारतीय संसद ,
- निर्मिती : मानवी हक्कावर आधारित १६० कोटी वचनांची , आदर्श नागरिक रुपी ७७० शरण –शरणी व १९६००० जंगमांची
- मानवी वर्तन, स्वभाव , समकालीन प्रश्न, समस्या, धर्म ,धार्मिक रूढी ,परंपरा इत्यादीवर विवेक , बुद्धीप्रामाण्यावाद, प्रज्ञा या मार्गाने सामुहिक चर्चा करून एकमताने निर्णय करणारे संस्कार केंद्र .
- आपल्या समस्या वर आपणच सामुहिक चर्चा करून न्याय्य उत्तर शोधणारे ठिकाण
- राजेशाही , सरंजामशाहीला लोकशाहीच्या कार्यप्रणालीची ओळख करून देणारे अनुभाव्यांचे विचार पीठ
- ज्ञानाच्या देवाणघेवाणीचे मुक्त विद्यापीठ व ज्ञानाच्या भुकेला अनुभावाची तृप्ती

- लिंगायत तत्वज्ञानाचे प्रचारक : शरण व जंगम
- शरण संख्या : ७७० (७०० पुरुष , ७० स्त्रिया )
- शरण म्हणजे परिपूर्ण आदर्श मानव
- शरणाची लक्षणे : सदाचारी , कायकनिष्ट ,अंतरंग –बहिरंग शुद्ध , मानवी मूल्याचा प्रवाहक , एकेश्वरवादी
- माझ्याहून लहान कोणी नाही , शरणापेक्षा महान कोणी नाही- बसवन्ना
- राजवाड्यातील राजाची राणी होण्यापेक्षा शरणाच्या घरची दासी होणे योग्य आहे.
- शरण : अठरा पगड जातीतील(बहुजन वर्गातले ) , १२ बलुतेदार १८ आलुतेदार , सवर्ण –शुद्र , स्त्री –पुरुष , ज्ञान व विवेकाची जिज्ञासा असणारे सर्व.
- साम्य : भिखु, मुनी श्रावक , मावळे , वारकरी संत
- शरण कोणास म्हणावे -कनिष्ठ जातीत जन्म जरी झाला विचार चांगला जारी त्याचा अशाचा शेजार असावा निश्चित संशय न त्या असू द्यावा सन्मार्गी जो चाले शरण त्या म्हणा शरणार्थी म्हणा त्यालागी कुडलसंगमदेवा मातंग चन्नय्या हीन नाही तया मानिले
-

- ## लिंगायत तत्वज्ञानाचे प्रचारक : जंगम
- बसवन्नानी – १९६००० जंगमांची निर्मिती केली
- जंगम लिंगायत संस्कार ,संस्कृती ,तत्वज्ञान आदीचा धडा शिकविणारा अग्रदूत
- जंगम जात नसून समाज , योग्यता व पात्रता आहे : ज्ञानी ,सदाचारी , व , ज्याच्यात सुज्ञान आचार आहे तोच जंगम (चन्नबसवन्नाचे वचन )
- जंगम धर्म वाहक ,धर्म प्रसारक आहे.

# स्त्री प्रधान तत्वज्ञान .

- लिंगायत तत्त्वज्ञानाच्या निर्मितीत स्त्रियांचे महत्वपूर्ण योगदान आहे.
- ७० स्त्रियांनी निर्माण केलेले तत्वज्ञान
- स्त्री महात्म्याची अवहेलना करणाऱ्या रूढी –परंपरा –संस्कारास विरोध – बालविवाह , बहुपत्नीत्व ,सती प्रथा ,दासी –प्रथाना विरोध
- मन माझे न धावे सैरावैरा , हे कथितो मी शपथेवर शंकरा , पर सतीस मानितो मी महादेवी हे कुडलसंगमदेवा- बसवन्नाचे वचन .
- स्त्रियांना सामाजिक.धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक ,राजकीय व अभिव्यक्तीचे अधिकार देणारा धर्म .
- अनुभव मंटपात स्थान
- स्त्री –पुरुष समता , महिला सबलीकरण मान्यता देणारे तत्वज्ञान

# कायकनिष्ठ तत्वज्ञान .

- कायक वे कैलास : श्रम हाच परमेश्वर
- लिंगायत धर्माला कायक धर्म हि म्हणतात.
- कायक : कर्तव्य , ईश्वरप्राप्ती , मोक्ष , स्वर्ग, श्रमएव जयते,
- कायक प्रेमी समाज व नागरिक निर्माण केले.
- जो गुंतला कायकात त्यास नाही गरज गुरु सानिध्य , नको लिंगपूजाहि, नको कर्तव्यविना अन्य विचार ,नाही कायकाविना दुजा कैलास – अदक्की मारय्याचे वचन
- कायकात : सर्वांसाठी आवश्यक ,प्रामाणिकता व समाजउपयोगिता असावी .
- कायक – भिक्षावृत्ती , ऐतखाऊवृत्ती नष्ट करून स्वावलंबी समाज ,आत्मनिर्भरता ,आर्थिक व सामाजिक समता व सामाजिक कृतज्ञतेची जाणीव निर्माण करणारे तत्वज्ञान आहे.

# दासोही तत्वज्ञान .

आयुष्य अजून बाकी आहे, प्रलय होणारच नाही , या विचाराने धन नका ठेवू पुरून प्रलय आला अन आयुष्य संपले तर, पुरून ठेवलेल्या संपत्तीचा उपभोग घेणार कोन ? जमीन खोदुन धन नका ठेवू गाडून . गिळकृत केलेले धन बाहेर टाकेल का जमीन

? धन जमिनीत पुरून अथवा अवघे ते पाहून नका राहू उपाशी .पहा बंधुनो , धन संपत्तीचा उपभोग घ्या , अन दासोही बनून शरण सेवेत सामील व्हा , समाज सेवेत सामील व्हा , हे कुडलसंगमदेवा

- स्वअर्जित/स्वमेहनतीने कमवलेल्या धनातून समाज,राष्ट्र हितासाठी दासोह करावे .
- दासोह दान नव्हे सामाजिक समर्पण,सामाजिक कृतज्ञता आहे,
- दासोह सामाजिक जबाबदारीची भावना आहे .
- दासोहाला धार्मिक ,शारीरिक ,मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ व महत्व आहे.
- संपत्ती संग्रहला विरोध

# समतावादी तत्वज्ञान –

- लिंगायत तत्वज्ञान–जन्म ,लिंग,जात,वर्ण,अर्थ,पद,व्यवसाय हा भेद नाकारतो

हा कोणाचा हा कोणाचा हा कोणाचा असे मज न म्हणवी देवा

हा आमुचा हा आमुचा हा आमुचा असेचि म्हणवावे देवा – बसवन्ना वचन

ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत सर्व शिवभक्तांना समान मानतो

ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत सर्व अज्ञानी जणांना समान मानतो –बसवन्ना वचन

चिखल मातीत जनावरांचे पाय पडले सांगता येतात. पण त्याच मातीत ,चिखलात माणसाचे पाय पडले तर ते पूल कोणत्या जातीच्या माणसाचे आहे ते सांगता येत नाही. ते फक्त माणसाचे आहे एवढेच सांगता येते - बसवन्ना वचन

विषमतावादी तत्वांना विरोध : जात,अंधश्रद्धा, कर्मकांड ,वैदिक धर्म ,धर्मग्रंथ आदि

गुण व कर्मावर आधारित स्थान व भूमिकांना मान्यता

वडील माझे मातंग चन्नय्या, आजोबा माझे ढोर कक्कय्या, चुलते माझे चिक्कय्या,बंधू माझे किन्नरी बोमय्या ,हेची माझे पूर्वज़ थोर ,असे मी यांचा वंशज मला तुम्ही कसे जानत नाही? हे कुडलसंगमदेवा – वचन

स्त्री- पुरुष समता , सामाजिक समता ,आर्थिक समता

चातुर्वर्ण , जातीयता ,अस्पृश्यता , होमहवन ,कर्मकांड ,

# एकेश्वरवादी तत्वज्ञान .

- दगडाचा देव देव नाही , मातीचा देव देव नाही , धातूचा देव देव नाही सेतुबंध , रामेश्वर ,गोकर्ण कशी , केदार ईतर ठिकाणचा देव देव नाही तुमच्या अंतर्यामीचा देव शोधा तुम्हीच देव आहात
- बहुदेवोपासना हा व्याभिचार मानला
- ईश्वराला प्रसन्न करण्याची पद्धती – नको करू चोरी , नको करू हत्या , नको बोलू असत्य ,नको धरू मनी द्वेष ,नको करू आत्मस्तुती , नको करू निंदानालस्ती नको मानू कोणा तुचह हिच अंतरंग शुद्धी ,हिच बहिरंगशुद्धी अन हिच कुडलसंगम देवास प्रसन्न करण्याची खरी पद्धती

# ज्ञान व विवेकवादी तत्वज्ञान .

- भूमी तुझी नव्हे ? सोनं तुझ नव्हे ? स्त्री तुझी नव्हे ? हा जगव्यवहार आहे. ज्ञान दिव्यरत्न आहे , ज्ञान सर्वश्रेष्ठ अलंकार आहे. ज्ञानीच जगात सर्वात श्रीमंत आहे.- अल्लमप्रभू
- अरे देवाला पाणी घालता तो काय उन्हाने त्रासला आहे अरे देवाला फुले वाहत तो काय विलासी राजा आहे मनाची व ज्ञानाची पूजाच श्रेष्ठ आहे -सिद्धरामेश्वर
- साक्षरता अभियान राबवले .
- अंधश्रद्धा निर्माण करणारा धर्म व मिथ्यक – बहुदेवोपासना , कर्मकांड, मूर्तीपूजा,यज्ञविधि , मंत्र-तंत्र, तीर्थ स्नान ,मुहूर्त , पुरोहीतशाही, मंदिर महात्म्य, पाप-पुण्य , शुभ –अशुभ आदि .
- देहच देवालय , सदाचार हीच पूजा , ज्ञान हाच गुरु , प्रयत्नवादी , कायकनिष्ठता सांगीतली .
- श्रद्धाना – शिक्षण ,अनुभव ,ज्ञान, मानवी मूल्य,बुद्धी ,प्रज्ञा ,शील, आचरण याची जोड दिली
- व्यक्ती व समाजाला डोळस बनवले .
- लोक करतात म्हणून स्वीकारू नये

# विद्रोही तत्वज्ञान

- माणसातच देव /ईश्वर आहे.    बाह्य अवडंबर नाकारले.
- शुभ अशुभ निरर्थक आहे.        जप-तप व्यर्थ आहे.
- वर्णानां ब्राह्मणो गुरु हे खोटे आहे .
- वेद ,शास्त्र आगम ,पुराणांचा धिक्कार पंचसुतक नाकारले
- वैदिक संस्कारांना नाकारले
- वेदावर तलवार चालविण ,शास्त्रांना बेड्या घालेन तर्काच्या पाठीवर चाबकाचे फटकारे ओढेन आगमांचे नाक कापेन महादानी कुडलसंगदेवा मादार चन्नय्याचा पुत्र असे मी

# पूर्व सुरीच्या धर्म संकल्पनाना नवा आयाम देणारे तत्वज्ञान

- अभिवादन पद्धतीत बदल- शरणू शरणार्थ
- स्वर्ग- नरक- सदाचार वे स्वर्ग –अनाचार वे नरक
- शिवतत्व : शरणाची वाणी जप : शरणाची झोप
- शिवरात्र : शरणाचे जागरण
- पुरोहित –जंगम गुरु : ज्ञान
- देवालय : देहच देवालय –धनिक बांधती देवालय देवा गरीब मी काय करू ? देहच माझे मंदिर पायच माझे देवळाचे खांब मस्तक माझे देवळाचे कळस स्थावर पावे नाश
- मोक्ष : कायक कैलास –पृथ्वी
- धर्म : दया दयेविण धर्म तो कोणता दया असावी सकळ प्राणीमात्रा ठायी दया हेचि धर्माचे मूळ
- जगद्गुरू : श्रमिकांच्या झोपडीला कैलास मानणारा
- पर्यावरणवादी अंत्यसंस्कार पद्धती
- संन्यास नाकारला - गृहस्त जीवन पद्धती
- मरण महानवमी


# लिंगायत धर्माची प्रतीके



विभूती



ईष्टलिंग पेटी चांदीची



विभूती धारणा



षटस्थल



ईष्टलिंग पूजा



ईष्टलिंग कर



ईष्टलिंग



रुद्राक्ष



कापडी ईष्टलिंग पेटी

# लिंगायत तत्वज्ञानाचे सार- एकाच वचनात

आचरण हाच गुरु आहे ,आचरण हेच लिंग आहे , आचरण हाच जंगम आहे ,आचरण हाच प्रसाद आहे ,आचरण हाच भक्त आहे , आचरण न करणारा गुरु नसून नर आहे , आचरण न करता बांधलेले लिंग हे लिंग नसून पाषाण आहे आचरण न करणारा जंगम हा जंगम नसून वेषधारी आहे विना आचरणाचा प्रसाद हा प्रसाद नसून उष्टे आहे आचरण न करणारा शरण हा शरण नसून मूर्ख आहे . म्हणून या सर्वाला सदाचार हेच कारण आहे सदाचार हेच मूळ आहे.